## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /१६९९/२०२४/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| श्री. अरुण रामदास रोडे | सहाय्यक निबंधक (पतसंस्था), सहकार आयुक्तालय, पुणे | उपनिबंधक (पतसंस्था), सहकार आयुक्तालय, पुणे |

**(सुनावणी दिनांक- १३/०८/२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नाशिक यांचेकडे दि. २६/०१/२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपील पुणे खंडपीठ कार्यालयास दि. ११/०३/२०२४ रोजी हस्तांतरणाने प्राप्त झाले आहे. व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये जाणीवपूर्वक दिशाभूल करणारे उत्तर, माहिती दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २१/०९/२०२२ | दि. १२/०७/२०२२ रोजी अन्याय निवारण निर्मुलन सेवा समीतीच्या सोबतच्या पत्रानुसार कार्यवाहीचा अहवाल पत्र व सोबतच्या टिपणीच्या प्रती, राजे शिवाजी ग्रामीण बिगरशेती पतसंस्था मर्या., कान्हुन पठार या संस्थेच्या तक्रारीबाबतची माहिती |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर अवगत केले की, अपिलार्थीस दि. २१/१०/२०२२ रोजीच्या पत्राने "उपरोक्त माहिती अधिकारातील अर्जात आपण नमुद केलेल्या माहितीबाबत या कार्यालयाच्या स्तरावर कार्यवाही चालु आहे." असे कळविले. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक (पतसंस्था), सहकार आयुक्तालय पुणे, जि. पुणे यांच्या ०२/०१/२०२३ रोजीच्या अपील आदेशानंतरही अपिलार्थीस दि. ०६/०१/२०२३ रोजीच्या पत्राने "सदरची माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती प्राप्त होताच आपणास तात्काळ देणेत येईल." असे कळविले आहे.

उपलब्ध अभिलखेवरुन, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक (पतसंस्था), सहकार आयुक्तालय, पुणे यांनी अपिलार्थीस माहिती अर्जावर दि. २१/१०/२०२२ व प्रथम अपील आदेशानंतर दि. ०६/०१/२०२३ रोजी वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविल्याचे दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणी, अपिलार्थीस माहितीचे प्रदान झालेले नाही. सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक (पतसंस्था), सहकार आयुक्तालय, पुणे यांनी अपिलार्थीच्या जोडपत्र -अ मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने सदर विषयाबाबत सद्यास्थितीत उपलब्ध असलेली माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) नुसार शीघ्र टपालाने विनामुल्य उपलब्ध करून द्यावे.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक (पतसंस्था), सहकार आयुक्तालय पुणे, जि. पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ /१६९९/२०२४/पुणे 10915 दिनांक - 18/12/25